


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २८, रविवार १५ डिसेंबर २०२४ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# शिबिरे ३, तपासणी ११३०, चष्मे ७९८, शस्त्रक्रिया ११०!

## ■ शरद पवारांच्या वाढदिसानिमित्तच्या शिबिरांना मोठा प्रतिसाद
## ■ खा. नीलेश लंके, राणी लंके यांचा पुढाकार

**पारनेर : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या ८४ व्या वाढदिसानिमित्त खा. नीलेश लंके व राणी लंके यांच्या संकल्पनेतून पारनेर-नगर मतदारसंघात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया व चष्मे वाटप शिबिरास मोठा प्रतिसाद लाभत आहेत. गुरूवारपासून तीन शिबिरे पार पडली असून त्यात १ हजार १३० रूग्णांची नेत्र तपासणी, ७९८रूग्णांना चष्मे वाटप करण्यात आले असून ११० रूग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.**

खा. लंके यांच्या संकल्पनेतून गेल्या पाच-सहा वर्षांपासून शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वेगवेगळे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून आजवरच्या उपक्रमांना नागरीकांचा मोठा प्रतिसाद लाभला आहे. यंदाही विविध उपक्रम हाती घेण्यात आले असून त्यास गावोगावी प्रतिसाद लाभतो आहे. दि. १२ डिसेंबर रोजी गरजू खा. लंके यांच्या संपर्क कार्यालयात मतदारसंघातील ५०० गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकलचे वितरण करण्यात आले. ५० ज्येष्ठ नागरीकांना काठयांचे वितरण करून त्यांच्याशी हितगुज करण्यात आले.

पारनेर येथील कार्यक्रम राणी लंके, राष्ट्रवादी काँग्रेस व नीलेश लंके प्रतिष्ठाणने पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. यावेळी बोलताना राणी लंके यांनी आम्ही केवळ निवडणूकीपुरते समाजोपयोगी उपक्रम राबवित नाही तर सामाजिक बांधिलकीतून २४ तास ३६५ दिवस समाजासाठी उपलब्ध असतो असे सांगितले. निवडणूकीतील जय-पराजयापेक्षा सामाजिक बांधिलकीच आमच्यासाठी महत्वपुर्ण असल्याचे सांगतानाच पराभवामुळे लंके परिवार खचून जाणारा नाही असे निक्षून सांगितले. नीलेश लंके परीवारातील सदस्यांनी पराभवाचे शल्य मानातून काढून टाकून नव्या जोमाने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले होते.



■ शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद मिळत आहे.

### शनिवारी लोणीमावळा

शनिवारी सकाळी लोणीमावळा येथे २७० रूग्णांची नेत्रतपासणी करण्यात येउन २१२ रूग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. ४० रूग्णांच्या डोळयांना मोतीबिंदू असून त्यांच्यावर लवकरच शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. दुपारनंतर नगर तालुक्यातील निंबळक येथे नेत्रतपासणी शिबिर सुरु झाले. तिथेही रूग्णांचा मोठा प्रतिसाद लाभला उशिरापर्यंत नेत्रतपासणी सुरुच होती.

### बाभुळवाडे व वडझिरे

बाभुळवाडे येथून या नेत्रतपासणी शिबिरास सुरूवात झाली. येथे १५३ रूग्णांची तपासणी करण्यात येऊन ११८ रूग्णांना चष्मे वाटप करण्यात आले. १९ रूग्णांवर लवकरच मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रीया करण्यात येणार आहे. गुरूवारी दुपारी वडझिरे येथे ४५० रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.२८० रूग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले तर २२रूग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

### शुक्रवारी जवळे

शुक्रवारी दिवसभर जवळे येथे ५२७ रूग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली, त्यातील ४०० रूग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले तर ६९ रूग्णांच्या डोळयांचे मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

### राणी लंके यांच्या भेटी

प्रत्येक शिबिरास जि.प.च्या माजी सदस्या राणी लंके या भेट देऊन रूग्णांची विचारपुस करत आहेत. प्रत्येक रूग्णाची तपासणी करून त्यास चष्मा देण्यासंदर्भात तसेच मोतीबिंदू असल्यास त्याच्या शस्त्रक्रियेची व्यवस्था करण्याच्या सुचना त्या देत आहेत.

### ५ जानेवारीपर्यंत शिबिरे

या मोफत शिबिराचा मतदारसंघातील प्रत्येक गरजू व्यक्तिला लाभ व्हावा या हेतूने विविध गावांमध्ये ५ जानेवारीपर्यंत या मोफत शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या रूग्णांना चष्मे हवेत त्यांना ते दिले जातील व सर्वांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रियाही करण्यात येणार असल्याचे खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयाकडून सांगण्यात आले.

### लंके यांचे स्वागत

शिबिराला भेट देण्यासाठी पोहचलेल्या राणी लंके यांचे स्थानिक नागरीकांकडून उस्फुर्त स्वागत करण्यात येत आहे. निवडणूकीत निसटता पराभव झाला असला तरी सर्वसामान्य जनता हीच आमची संपत्ती या भावनेतून लंके यांचा परिवार सतत लोककल्याणासाठी धडपडत असतो हेच या कृतीतून सिध्द होत असल्याच्या प्रतिक्रीया नागरीक देत आहेत. विशेषतः महिला वर्गाकडून राणी लंके यांचे जोरदार स्वागत करण्यात येत असून त्यांच्यासमवेत सेल्फी काढण्यासाठीही गर्दी होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# उद्योजक मारहाण प्रकरणातील सर्व आरोपी फरार

## सहा. पोलिस निरीक्षक मोनिका जोजाट यांची माहिती

**सुपा : प्रतिनिधी**

**सुपे औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकास अमानुषपणे मारहाण केल्याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेले सहाही आरोपी फरार असून सुपा पोलीस त्यांचा शोध घेत असल्याची माहिती तपासी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक मोनिका जोजाट यांनी दिली.**

पुर्वी व आपल्या कंपनीमध्ये कामासाठी असलेला कामगार शेजारच्या कंपनीमध्ये कामाला गेल्याच्या रागातून युनिटेक स्टिल स्ट्रक्चर प्रा. लि. कंपनीचा मालक सचिन रमेश मुठे याने कामगार आशिषकुमार श्रीराम भारती रा. नसीराबाद, ता. रतनापुर जि. मउ, उत्तरप्रदेश यास बुधवार दि. ११ रोजी सायंकाळी मारहाण केली होती. ही माहिती आशिषकुमार हा सध्या ज्या कंपनीमध्ये कामासाठी आहे त्या शुभ इंजिनिअरिंग ॲण्ड फॅब्रिकेशन चे मालक प्रमोद उरमुडे रा. भोयरे पठार ता. नगर यांना त्याच वेळी दिली. गुरूवार दि. १२ रोजी सकाळी प्रमोद उरमुडे यांनी सचिन मुठे यास झालेल्या प्रकाराबाबत समजावून सांगितले होते. त्याच वेळी वाद संपला असे गृहीत धरून प्रमोद उरमुडे हे सुपा एमआयडीसी चौकात निघून गेले होते.

गुरूवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास सचिन मुठे रा. भोयरे पठार, ता. नगर हा प्रशांत दिलीप आंबेकर, पवन रमेश मुठे, साहील भाउसाहेब आंबेकर, ज्ञानदेव दत्तू कार्ले सर्व रा. भोयरे पठार, ता. नगर व दत्ता पवार पुर्ण नाव नाही रा. पिंपळगांव कौडा, ता. जि. नगर यांना घेऊन प्रमोद उरमुडे यांच्या कंपनीमध्ये गेला. तिथे उपस्थित प्रमोद उरमुडे




यांचा मुलगा दिनेश उरमुडे यांना सर्व सहा आरोपींनी शिविगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. कंपनीमधील लाकडी दांडके, लोखंडी गज, खुच यांच्या साहाय्याने दिनेश यास अमानुषपणे मारहाण करण्यात आली. ही सर्व मारहाण तेथील सीसीटीव्ही फुजेटमध्ये कैद झाली आहे. मारहाण सुरू होती त्यावेळी कंपनीतील कामगार दिनेश यांना वाचविण्याचा प्रयत्न करत होते, मात्र त्यांना न जुमानता हे आरोपी दिनेश यास बेदम मारहाण करत होते. मारहाणीमुळे दिनेश जमिनीवर कोसळल्यानंतर हे टोळके घटनास्थळावरून पसार झाले.

या प्रकरणी सहाही आरोपींविरोधात सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाययक पोलीस निरीक्षक मोनिका जोजाट या पुढील तपास करत आहेत. त्यांच्याशी संपर्क साधला असता तपास सुरू असून पोलीस पथक आरोपींचा शोध घेत आहेत. घटनेनंतर सर्व आरोपी फरार असल्याचे त्यांनी सांगितले.

# जनतेच्या अपेक्षा पुर्ण करण्याला प्राधान्य

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही

**संगमनेर : प्रतिनिधी**

**राज्यातील जनतेन महायुती सरकारला मोठे पाठबळ दिले आहे.जनतेच्या मनातील अपेक्षा पूर्ण करणे हेच आमचे प्राधान्य असून,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट आम्ही पूर्ण करणार असल्याची माहिती ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**



नागपूर अधिवेशनासाठी रवाना होण्यापुर्वी ना.विखे पाटील यांनी श्रीक्षेत्र निझर्णेश्वर येथे महादेवाचे दर्शन याप्रसंगी आ.अमोल खताळ , प्रवरा बँकेचे व्हा.चेअरमन मच्छिंद्र थेटे,संचालक रामभाऊ भुसाळ,तहसिलदार धीरज मांढरे गटविकास अधिकारी अनिल नागणे पोलीस उपअधिक्षक कुणाल सोनवणे आदी. याप्रसंगी उपस्थित होते.

लोणी बुद्रुकचे ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराजांच्या यात्रोत्सवात त्यांनी ग्रामस्थांसमवेत सहभागी होवून दर्शन घेतले.यात्रेनिमित काढण्यात येणार्या काठीची विधीवत पूजा ना.विखे पाटील आणि डॉ.सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करून मिरवणूक काढण्यात आली.

माध्यमांशी संवाद साधताना ना.विखे पाटील म्हणाले की,राज्यातील जनतेने महायुतीला मोठा प्रतिसाद मिळाला.याचे एकमेव कारण म्हणजे मागील अडीच वर्षात सरकारने घेतलेले महत्वपूर्ण निर्णय आहे.आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्या नंतर राज्याला पुढे कसे घेवून जायचे याबाबत निर्णय घेण्यास प्रारंभ केला आहे.प्रत्येक विभागासाठी शंभर दिवसांचा कृती आरखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या असून तोच आमचा उर्वरीत पान ३ वर

# मंत्रीपदाची शपथ कोण घेणार? याद्या ठरल्या?

## संभाव्य आमदारांच्या नावांची जोरदार चर्चा!



**मुंबई : प्रतिनिधी**

**देवेंद्र फडणवीस सरकारचा पहिला मंत्रीमंडळ विस्तार कधी होणार? याविषयी दावे केले जात असतानाच या मंत्रीमंडळ विस्तारात कोण शपथ घेणार? याचीही जोरदार चर्चा सध्या रंगताना पाहायला मिळत आहे. याद्या तयार झाल्या असून केंद्रीय नेतृत्वाच्या मंजुरीची प्रतीक्षा असल्याचे विधान देवेंद्र फडणवीसांनी दिल्लीत केले होते. त्यामुळे आता संभाव्य नावांची चर्चा सुरू झाली आहे.**

**गृहमंत्रीपदाचा तिढा सुटला?**

शिवसेना (एकनाथ शिंदे) गृहमंत्रीपदासाठी आग्रही असल्याची चर्चा असून त्यासाठीचएकनाथ शिंदेशेवटच्या काही तासांपर्यंत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यास संमती देत नव्हते, असेही दावे केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर आता गृहमंत्रीपदाचा तिढा सुटल्याचे बोलले जात आहे. देवेंद्र फडणवीसांकडेच गृह खात्यासह अर्थखात्याचाही कारभार असेल अशी चर्चा आहे. एकनाथ शिंदेंकडे महसूल खात्यासह नगरविकास खातं जाऊ शकतं, तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण खात्याचा कारभार दिला जाऊ शकतो.

**भाजपाच्या यादीत कुणाचा समावेश?**

दरम्यान, तिन्ही सत्ताधारी पक्षांच्या मंत्रीपदांच्या याद्या तयार झाल्याचं बोललं जात आहे. यात अनेक नावांची चर्चा पाहायला मिळत आहे. यात राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भारतीय जनता पक्षाकडून राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, पंकजा मुंडे, शिवेंद्रसिंह राजे भोसले, अतुल सावे, माधुरी मिसाळ, संजय कुटे, जयकुमार रावल,आशिष शेलार,रवींद्र चव्हाण, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, अतुल भातखळकर, नितेश राणे व गोपीचंद पडळकर या आमदारांची नावं मंत्रीपदासाठी चर्चेत आहेत.

एकनाथ शिंदेंच्या यादीत कुणाचा समावेश?

एकनाथ शिंदेंकडून पहिल्या मंत्रीमंडळ विस्तारामध्ये उदय सामंत, शंभुराज देसाई,गुलाबराव पाटील,दादा भुसे, प्रताप सरनाईक, संजय शिरसाट, भरत गोगावले, आशिष जयस्वाल व योगेश कदम या आमदारांची मंत्रीपदासाठी चर्चा आहे.

**अजित पवारांच्या यादीत कुणाचा समावेश?**

सत्ताधारी महायुतीमधला तिसरा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) यादीतही संबंधित आमदारांची नावं असल्याची चर्चा आहे. त्यात छगन भुजबळ, धनंजय मुंडे, आदिती तटकरे, नरहरी झिरवाळ, अनिल पाटील, संजय बनसोडे व मकरंद पाटील यांना कॅबिनेट मंत्रीपद तर सना मलिक व इंद्रनील नाईक यांना राज्यमंत्रीपद मिळेल अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

# "महायुतीत मलईदार खात्यांसाठी भांडणं"

## मंत्रिमंडळ विस्तारावरून नाना पटोलेंचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

**महायुतीत मलईदार खात्यांसाठी भांडणं सुरु आहेत. मलईचं खातं कोणाला मिळेल? फक्त यासाठी सरकार काम करत असल्याचा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. तसेच परभणीत घडलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीच्या अवमानाच्या घटनेवरूनही त्यांनी राज्य सरकारवर टीका केली. नाना पटोले काय म्हणाले?**



परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान झाल्याच्या घटनेबाबत बोलतानानाना पटोलेम्हणाले, "परभणीतील घटनेचा आम्ही निषेध करतो. संविधान प्रतिकृती विटंबनेच्या घटनेप्रकरणी आम्ही सरकारकडे कारवाईची उर्वरीत पान ३ वर

# लालकृष्ण अडवानी यांची प्रकृती खालावली


## अपोलो रुग्णालयात दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची प्रकृती खालावली असून त्यांना दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार लालकृष्ण अडवाणी यांना नियमित तपासणीसाठी अपोलो हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. सध्या ते डॉक्टरांच्या निरीक्षणात असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.**

या वर्षाच्या सुरुवातीलाही ऑगस्ट महिन्यात अडवाणी यांना अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. जुलै महिन्यातही देशाचे माजी गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर एम्समध्ये डॉ. अमलेश सेठ यांच्या देखरेखीखाली उपचार करण्यात आले. त्यावेळी अडवाणींना युरोलॉजी विभागात दाखल करण्यात आले होते.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, लालकृष्ण अडवाणी हे गेल्या काही दिवसांपासून आरोग्याशी संबंधित समस्यांनी त्रस्त होते. त्याच वर्षी त्यांना



देशाचा सर्वोच्च सन्मान भारतरत्नही देण्यात आला. आरोग्याच्या समस्यांमुळे ते राष्ट्रपती भवनात होणाऱ्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांना त्यांच्या निवासस्थानीच भारतरत्न प्रदान करण्यात आला. ८ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. पीएम मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर फोटोही शेअर केला आहे. ज्यामध्ये पीएम मोदी लालकृष्ण अडवाणींना पुष्पगुच्छ देताना दिसले. पीएम मोदींनी फोटोच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते, "आडवाणीजींच्या निवासस्थानी भेट दिली आणि त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या."



फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## लग्नात रॉयल लूक!



**लग्नसमारंभ ठरतो तेव्हा सर्वात पहिले लग्नासाठी अर्थात वेडिंग लुकसाठी काय घालायचे आणि काय निवडायचे अथवा कशी स्टाईल करायची याबाबत आपण विचार करायला लागतो. जेव्हा आपल्याला लग्नासाठी काही स्टाईल करायची असते तेव्हा सहसा आपण पारंपरिक आणि वेगवेगळ्या साड्यांचे पर्याय आपण निवडतो. तुम्हाला पारपंरिक वेडिंग लुक हवा असेल तर तुम्ही बनारसी साड्यांचा अथवा बनारसी लेहंगाचा पर्याय निवडा. बनारसी कपडे हे नेहमी तुम्हाला रॉयल लुक मिळवून देतात. जेव्हा फेस्टिव्ह सीझन असतो तेव्हा महिलांना बनारसी लेहंगा अथवा बनारसी साडी खरेदी करणे नक्कीच आवडते. बनारसी लेहंग्याच्या करा वेगळी स्टाईल आण दिसा अधिक आकर्षक आणि सुंदर. कसे ते घ्या जाणून...**

### गोल्ड एम्ब्रॉयडरीचा लाल बनारसी लेहंगा

तुम्ही जर लवकर लग्न करणार असाल तर गोल्ड एम्ब्रॉयडरीचा लाल बनारसी लेहंगा हा तुमच्यासाठी योग्य पर्याय आहे. कारण लग्नासाठी लाल आणि गोल्ड रंग हा एकत्र क्लासी लुक तुम्हाला मिळवून देतो. तुम्ही जर लाल रंगाचा लेहंगा घालणार असाल तर त्यासह सोन्याचे दागिने हा उत्तम पर्याय तुम्हाला स्टाईल करण्यासाठी मिळतो. तसंच तुम्ही यासह लाल चुडा घालणे अधिक चांगले दिसते अर्थात महाराष्ट्रीयन लग्नामध्ये हिरवा चुडा घातला जातो. मात्र हल्ली स्टाईलसाठी लाल चुडादेखील तुम्ही घालू शकता. अशा स्टाईलवर तुम्ही मिनिमल मेकअप ठेवा. भडक रंगाच्या बनारसी लेहंग्यासह भडक मेकअप चांगला दिसत नाही. तसंच तुम्ही अति बटबटीत डिझाईन निवडू नका. तर नवरीला साजेसे असे बनारसी लाल रंगाचा लेहंगा तुम्ही निवडा.

### बनारसी लेहंगा चोली आणि नेटचा दुपट्टा

तुम्हाला तुमच्या हेव्ही लेहंग्यासह हलका दुपट्टा घ्यायचा असेल तर तुम्ही नेटचा दुपट्टा वापरा. वास्तविक बनारसी लेहंगा आणि ब्लाऊज हा अतिशय हेव्ही वर्क डिझाईन्ससह असतो. त्यामुळे त्यावर साधा आणि सोबर दुपट्टा अधिक सुंदर दिसतो. यासह तुम्ही तुमचे दागिने कॉन्ट्रास्ट फॅशन करून वापरू शकता. हा लुकदेखील तुम्हाला अत्यंत सुंदर दिसतो. याशिवाय तुम्ही तुमच्या या लुकसह थोडासा वेगळेपणादेखील दाखवू शकता. त्यामुळे तुम्हाला हवं असेल तर तुमच्या लग्नासाठी अथवा जवळच्या कोणाच्याही लग्नामध्ये तुम्ही असा बनारसी लेहंगा चोली लुक नक्कीच ट्राय करू शकता.

### •अशी करा स्टाईल•

बनारसी लेहंग्याची स्टाईल करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. ते सर्वांनाच नीट जमते असं नाही. त्यामुळे याची स्टाईल नक्की कशी करायची याच्या काही खास टिप्स तुमच्यासाठी...

- तुम्हाला तुमच्या बनारसी लेहंग्यासह दुपट्टा स्टाईल करायचा असेल तर तुम्हाला यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. तुम्ही जर ब्राईड्समेड अर्थात करवली असाल आणि आपली बहीण अथवा आपल्या बेस्ट फ्रेंडच्या लग्नामध्ये बनारसी लेहंगा लुक करून वेगळा लुक मिळवायचा असले तर तुम्ही शॉल स्टाईलप्रमाणे यावर हा दुपट्टा परिधान करा.



- तुम्हाला तुमचा लुक साधा आणि सोबर हवा असेल तर तुम्ही दुपट्टा एका बाजूला घ्या. इतकंच नाही जर तुम्ही तुमच्या नातेवाईकांच्या कोणत्या कार्यक्रमाला वा समारंभाला जात असाल तर तुम्ही हा दुपट्टा साडी स्टाईलमध्येही घालू शकता. यामुळे बनारसी लेहंग्याचा बनारसी साडीसारखा लुक येईल. साडी कशी नेसायची हे जर तुम्हाला माहीत नसेल तर तुम्हाला हा पर्यायही उत्तम आहे.
- पारंपरिक लुकसाठी तुम्ही लेहंग्याचा दुप्पट्टा सरळ साडीच्या पदराप्रमाणेदेखील घेऊ शकता. अशा स्वरूपाने तुम्ही बनारसी लेहंग्यावर दुपट्टा स्टाईल करू शकता तुम्ही बनारसी लेहंग्यासह ब्लाऊजदेखील डिझाईनर वापरला असेल तर तुम्ही त्याच्या निऱ्या बारीक काढू शकता. याच्या पदराच्या बारीक निऱ्या काढून तुम्ही ब्लाऊजच्या डाव्या बाजूला पिनअप करा. असे केल्याने तुम्हाला बनारसी लेहंगा आणि दुपट्टा कॅरी करायला काहीच त्रास होणार नाही. बनारसी लेहंग्याची स्टाईल करताना तुम्ही या गोष्टी नेहमी लक्षात ठेवा आणि दिसा अधिक रॉयल आणि आकर्षक.

## लग्नासाठी रंग कोणता निवडू ?

**आताचा सगळा सीझन हा लग्नाचा आहे. त्यामुळे सगळीकडे खरेदीला चांगलाच जोर आला आहे. कपड्यांची, सोन्याची खरेदी मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. तुम्हीही या सीझनमध्ये लग्न करण्याचा विचार करत असाल तर रंगाचे काही खास ट्रेंड फॉलो करायला हवेत. आम्ही या सीझनचे असे काही रंग तुम्हाला सांगणार आहोत. जे तुम्ही नक्कीच तुमच्या लग्नाच्या सीझनमध्ये कुठेतरी वापरायला हवेत. चला जाणून घेऊया असे रंग...**

- लायलॅक (Lilac) : फिक्कट जांभळ्या रंगाची ही शेड सध्या चांगलीच चर्चेमध्ये आहे. डोळ्यांना सुखावणारा असा हा रंग खूप जणांच्या आवडीचा आहे. हा रंग लेहंगा आणि इंडो- वेस्टर्न आऊटफिटमध्ये अगदी सहज मिळू लागला आहे. या रंगाचा लेहंगा तुम्ही निवडला तर तुम्हाला त्यावर छान ज्वेलरी देखील निवडता येतात. मोती किंवा वेगवेगळ्या स्टोन्स ज्वेलरी या रंगावर फारच उठून दिसतात. तुमच्या जोडीदाराला त्यामुळे कोणताही लाईट रंग निवडण्याची मुभा मिळते.तुमचा जोडीदार पांढरा, मोती अशा शेड्समध्ये आरामात जाऊ शकतो. जर फिक्कट रंग तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही अगदी हमखास या रंगाची निवड करा.
- पीनट कलर (Peanut Colour) : पीनट अर्थात शेंगदाणा. तुम्ही टरफलातून शेंगदाणा काढून खाल्ला असेल तर त्याचे वेगवेगळे शेड तुम्हाला नक्कीच माहीत असेल. गुलाबी- चॉकलेटी याचा उत्तम समतोल साधलेला हा रंग दिसायला खूपच रिच आणि चांगला दिसतो. अगदी कोणत्याही स्किनटोनवर हा रंग उठून दिसणार नाही असे मुळीच होणार नाही. त्यामुळे हा रंगही सध्या चांगलाच ट्रेंडमध्ये आहे. त्यामुळे जर तुम्हाला तुमच्या लेहंग्याचा रंग हा घ्यायचा असेल तर तुम्ही हा रंग निवडू शकता. याला थोडा बोल्ड लुक द्यायचा असेल तर तुम्ही त्यावर हेव्ही वर्क घेऊ शकता.



- वाईन रंग (Wine Color) : वाईन रंग हा फॅशनच्या बाहेर कधीच जाऊ शकत नाही. विशेषतः काही ब्राईड्सना गडद रंग घालायला आवडतात. त्यांच्यासाठी हा रंग तर एकदम खासच आहे. जर तुम्हाला गडद रंग आवडत



असेल तुम्हाला वाईन शेड घ्यायला काहीच हरकत नाही. या रंगावर तुम्हाला मोती आणि काही इमिटेशन ज्वेलरी वापरता येतात. असा लेहंगा घातल्यानंतर तुम्हाला आजूबाजूचे डेकोरेशन हे थोडे लाईट रंगाचे निवडावे लागते. त्यामुळे तुम्ही हा रंग घेण्याचा विचार करत असाल तर लग्नासाठीचे डेकोरेशन कसे असावे याचा देखील विचार करा.
- हॉट पिंक (Hot Pink) : तुम्हाला गडद रंग निवडायचा असेल आणि तो ट्रेंडी हवा असे देखील वाटत असेल तर तुम्ही हॉट पिंक रंग निवडायलाही काहीच हरकत नाही. हा रंग खूपच चांगला उठून दिसतो. हॉट पिंक रंगावर तुम्हाला विरुद्ध म्हणजेच कॉन्ट्रास रंगाचे दुपट्टे किंवा ज्वेलरी निवडू शकता. या रंगाचा ब्लाऊज निवडताना ब्राईडल ब्लाऊजची निवड केली तर ते अधिक चांगे दिसतात. आता तुम्हाला जर काही खास रंग हवे असतील आणि तुमचा खास दिवस खूपच खास करायचा असेल तर या रंगाची निवड करू शकता.

## जाड नवरीला लेहंगा आवडतो?


**लग्नाच्या दिवशी प्रत्येक मुलीला अधिक सुंदर आणि आकर्षक दिसायचं असतं. लग्नामध्ये साडी कशी नेसायची याबाबत तर सर्वांना माहीत आहे. सहसा लग्नात वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या नेसल्या जातात. पण प्लस साईज महिलांना मात्र लग्नामध्ये लेहंगा घालताना काही अडचणी येऊ शकतात. जेव्हा अशा महिलांना लग्नात लेहंगा घालायचा असतो तेव्हा त्यांना आपण अधिक आकर्षक दिसावे असे वाटत असते. लग्नामध्ये प्रत्येक मुलगी ही आकर्षकच दिसते आणि त्यासाठीच तिचा प्रयत्न असतो. आपण अधिक जाड आहोत म्हणून लेहंगा घालायचाच नाही असं अजिबात करू नका. लेहंगा घालूनही तुम्ही अधिक सुंदर दिसू शकता. प्लस साईज नवरीने लेहंगा निवडताना काही काळजी घ्यावी...**

- लेहंग्याचा रंग : कोणत्याही आऊटफिटचा आणि विशेषतः नवरी जे आऊटफिट घालणार असेल त्याचा रंग अत्यंत महत्त्वाचा असतो. बरेचदा आपल्याला अनेक रंग दिसायला आवडतात. पण काही रंग असे असतात जे आपल्याला आवडले तरीही ते आपण घातल्यावर आपल्यावर चांगले दिसत नाहीत. प्लस साईज नवरीसाठी लग्नात गदड रंगाचा लेहंगा अधिक चांगला दिसतो. गडद रंगाच्या लेहंग्यामध्ये अशा महिला अर्थात प्लस साईज महिला या अधिक बारीक दिसतात आणि तो रंग तुम्हाला अधिक आकर्षक दिसतो आणि उठावदार दिसतो.




- ब्लाऊजची नेकलाईन : आधुनिक लुकसाठी बऱ्याचदा अनेक महिला ऑफ शोल्डर (Off Shoulder) आणि हॉल्टर नेक स्लीव्ह्ज (Halter Neck Sleeves) घालण्याला प्राधान्य देतात. पण प्लस साईज महिलांना अशा स्वरूपाच्या नेकलाईनपासून वाचणं गरजेचे आहे. ब्लाऊजचा नेकलाईन डीप नेक ब्लाऊज, स्क्वेअर, व्ही शेप (V Shape Blouse) अशा स्वरूपाचे तुम्ही लेहंग्यासाठी वापरू शकता. लेहंग्यासाठी पारंपरिक स्वरूपाचा ब्लाऊज तुम्ही वापरणे जास्त चांगले ठरते. प्लस साईज महिलांनी या गोष्टीची काळजी घ्यायला हवी की, लहंगा आणि ब्लाऊज या दोन्हीमध्ये जास्त अंतर असू नये. तसंच तुमची पाठ जास्त दिसू नये याचीही काळजी घ्या. जेणेकरून तुम्ही बारीक दिसाल.
- लेहंग्याची लांबी : प्लस साईज महिलांसाठी ब्रायडल लेहंग्याची लांबी ही जास्त असणे गरजेचे आहे. जेव्हा तुम्ही नवरी म्हणून लेहंगा घालणार असाल तेव्हा तुम्ही लग्नाआधी लेहंगा नक्की घालून बघायला हवा. तसंच तुम्ही या लेहंग्याची उंची जास्त ठेवावी. जेणेकरून तुमची जाडी लपली जाईल. तसंच तुम्ही जो लेहंगा घालणार आहात त्याखाली घालण्यात येणारे हिल्स दिसत नाही ना याचीही तुम्ही काळजी घ्या. तुमच्या पायातील हिल्स दिसणार नाहीत आणि ते लपले जातील इतकी लेहंग्याची लांबी असणे गरजेचे आहे.
- फिश शेप लेहंगा घालू नका : फिश शेप लेहंग्यामध्ये (Fish Shape Lehenga) तुमच्या शरीराचा आकार उठून दिसतो. पण बारीक असणाऱ्या मुलींनाच हा लेहंगा अधिक चांगला दिसतो. प्लस साईज महिलांना अजिबातच फिश शेप लेहंगा चांगला दिसत नाही. कारण यामध्ये पार्श्वभाग (hips) अधिक मोठे दिसतात, तर अशा महिलांना लेहंग्याचा ब्लाऊज हा कोपऱ्यापर्यंत घातला तर अधिक उठावदार दिसतो. तसंच अशा महिला बारीक दिसायला मदत मिळते. नवरी म्हणून तुम्ही फोटोमध्ये अधिक बारीक दिसायला हवं असेल तर तुम्ही अशा पद्धतीने लेहंग्याची स्टाईल करा.

## लग्नात साडी नेसताय? हेवी ब्लाऊज करा ट्राय



**लग्न म्हटले की, लग्नात नेमके काय नेसावे कधीच कळत नाही. लग्नसराईसाठी साड्या खूप वेगवेगळ्या प्रकारच्या मिळतात. पण तुम्हाला लग्नासाठी खूप पैसा खर्च करायची इच्छा नसेल पण लग्नात तरीही उठून दिसायचं असेल तर काही हॅक्स तुम्हाला नक्कीच कामी येतील. काही जणांना खूप हेवी साड्या घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते तर काही जणांना हेवी साड्या घ्यायला देखील आवडत नाहीत. अशावेळी तुम्ही हेवी ब्लाऊजची स्टाईल कॅरी केली तर ती अधिक चांगली दिसते. ब्लाऊजमध्येही तुम्हाला हल्ली असे काही प्रकार मिळतात जे तुम्हाला नक्की ट्राय करायला हवेत असे आहेत...**

- हेवी स्लिव्हज : साडी म्हटली की, तिचा सगळा शो पदर आणि ब्लाऊजवर अवलंबून असतो. लग्नात स्लिव्हलेस ब्लाऊज घालणारे फारच विरळा असतील. शक्यतो सगळेच फुल स्लिव्हज किंवा थोडे लाँग स्लिव्हज घालणेच पसंत करतात. तुम्हीही अशाच प्रकारे ब्लाऊज शिवणार असाल तर त्यावर सुंदर वर्क करून घ्या. बारीक काम करून केलेले हे ब्लाऊज दिसायला खूपच सुंदर आणि हेवी दिसतात. अशा पद्धतीने तुम्ही ब्लाऊज भरून घेतला की, तुम्हाला साडीकडे फारसे लक्ष द्यावे लागत नाही. तुम्ही अगदी तुम्हाला हवी तशी साडी ड्रेप केली की, आपोआपच सगळ्यांचे लक्ष तुमच्या साडीपेक्षा ब्लाऊजकडे जाते. या शिवाय हँडलुम ब्लाऊज हवे असतील तर त्याच्याही वेगवेगळ्या डिझाईन्स आहेत.
- कटवर्क ब्लाऊज : कटवर्क साडी हा सध्या सगळ्यांच्याच आवडीचा असा प्रकार आहे. हल्ली कटवर्कमध्ये इतके प्रकार पाहायला मिळतात की, तुम्हाला पाहिल्यानंतरच हा ब्लाऊज जास्त आकर्षक दिसतो. तुमच्या साडीवर आलेल्या ब्लाऊज पीसचा उपयोग करून तुम्हाला कटवर्क करता येऊ शकते. फुलांच्या, पक्ष्यांच्या अशा वेगवेगळ्या आकारात तुम्हाला कटवर्क करता येतात. कटवर्कमध्ये फुलांच्या कडा तुम्हाला अगदी स्पष्ट दिसतात. त्यामुळे हे ब्लाऊज दिसायला खूपच सुंदर आणि उठावदार दिसतात. ब्लाऊज शिवण्याआधी काही गोष्टी नक्की माहीत करुन घ्या. मग ते शिवायला टाका.



### वेलवेट ब्लाऊज

हल्ली ब्लाऊजमध्ये आणखी एक ट्रेंड चांगलाच पाहायला मिळत आहे तो म्हणजे वेलवेट ब्लाऊज. दिसायला एकदम रिच आणि कोणत्याही साडीचा लुक दुपटीने अधिक चांगला करणारा हा प्रकार तुमची साडी अगदीच साधी असेल तर वापरायला काहीच हरकत नाही असा आहे. तुमच्याकडे एकतरी ब्लाऊज हा वेलवेटचा असायलाच हवा. तरच तो जास्त चांगला उठून दिसतो. त्यामुळे तुम्ही लग्नात एकतरी असा वेलवेट ब्लाऊज घ्या. त्यावर जर तुम्हाला शक्य असेल तर थोडे वर्क करुन घ्या. थ्रेड वर्क केलेले ब्लाऊज सुद्धा यावर खूप चांगले उठून दिसतात. त्यामुळे तुम्हाला तसे काही ट्राय करायलाही काहीच हरकत नाही. हे तीन प्रकार तरी तुम्ही नक्की ट्राय करा तुम्हाला नवरी असल्याचा फिल आल्यावाचून राहणार नाही.

### फेस सिरम लावताय ? परफेक्ट इफेक्टसाठी स्मार्ट टिप्स

१ सिरम लावताना चेहरा आणि हात स्वच्छ करा. चेहऱ्यावर प्रमाणापेक्षा जास्त ओलसरपणा नसेल याची काळजी घ्या. कोरड्या त्वचेसाठी आणि ओलसर त्वचेसाठी कोणते सिरम वापरायचे याबाबत योग्य ती माहिती घेऊन त्यानुसार सिरमचा वापर करा.

२ अनेकदा सिरम लावताना ते ड्रॉपरने थेट चेहऱ्यावर लावले जाते. असे करण्यापेक्षा हातावर काही थेंब घेऊन मग ते चेहऱ्यावर लावल्यास नीट लावले जाते. ड्रॉपरने सिरम कुठे जाते ते समजत नाही आणि काही ठिकाणी कमी लागते तर काही ठिकाणी जास्त लागते.

३ चेहऱ्यावर बोटाने लहान लहान ठिपके देऊन सिरम लावा. जेणेकरून चेहऱ्याचा कोणताही भाग वगळला जाणार नाही. सॅलिसिलीक ॲसिड असलेले सिरम तेलकट भागावर किंवा कपाळ, नाक या मुरूम येणाऱ्या भागात लावायला हवे.

४ सिरमचे चेहऱ्याला लावलेले ठिपके चेहऱ्यावर हळूवार समाज करत हाताने सगळीकडे एकसारखे पसरवा.

५ सिरम लावल्यावर चेहऱ्याला मसाज करण्याची गरज नसते. पण सिरम चेहऱ्यावर नीट पसरावे म्हणून वरच्या बाजूला आणि बाहेरच्या बाजूला मालिश करा. त्यामुळे तुमचा तणाव कमी होण्यास मदत होईल.

## शॉर्ट न्यूज

### प्रसादनगरला रोहिंग्यांचे वास्तव्य

**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर भागात काही रोहिंग्या तसेच बांगलादेशी घुसखोर अवैधरित्या वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले आहे. या वसाहतीत रोहिंग्यांकडून संशयास्पद हालचाली होत आहेत. सदरचे प्रकरण गंभीर असल्याने शासन तसेच प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन तपास करून उचित कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील मुथा यांनी केली आहे. यासंदर्भात माहिती देताना मुथा यांनी सांगितले.

### सराईत गुन्हेगारास राहाता पोलिसांकडून अटक

**राहाता :** अस्तगाव फाटा येथे पत्र्याच्या गाळ्यासमोर झोपलेल्या तिघांना मारहाण करत जबरी चोरी करणाऱ्या आंतर जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारास राहाता पोलिसांनी काल अटक केली. ४ डिसेंबर रोजी रात्री ११.३० च्या सुमारास अस्तगाव फाटा येथील एका पत्र्याच्या गाळ्यासमोर यातील फिर्यादी व सहकारी झोपेत असताना अज्ञात चार अनोळखी इसमांनी त्यांना दगडाने डोक्यात मारहाण करून जखमी केले. त्यांच्या खिशातील ओप्पो कंपनीचा मोबाईल व बवाना बंजारा याचे गळातील चांदीची चेन व जीओ कंपनीचा मोबाईल बळजबरीने काढून घेऊन निघून गेले.

### महावितरणच्या सहायक अभियंत्यास दमदाटी

**शेवगाव :** विजेचा अनधिकृत वापर करीत असताना आढळून आलेल्या व्यक्तीचा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी गेलेल्या वीज वितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंत्याला दमदाटी व शिवीगाळ करण्यात आली. ही घटना बुधवारी ( ११ डिसेंबर) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास शेवगाव तालुक्यातील मुर्शदपूर येथे घडली. याप्रकरणी वीज वितरण कंपनीचे सहायक अभियंता मिलिंद सुनील भामरे यांच्या फिर्यादीवरून रवींद्र अशोक धावणे व शेषराव विठ्ठल धावणे (दोघे रा. मुर्शदपूर ता. शेवगाव) यांच्या विरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पाचशे शिक्षक करणार प्लास्टिकचे संकलन

**संगमनेर :** नगरपरिषदेच्या वतीने प्लास्टिक व्यवस्थापन कृती आराखडा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात नगरपरिषदेच्या हद्दीतील विविध शाळांतील १८ हजारहून अधिक विद्यार्थी, पाचशे शिक्षक सहभागी झाले आहेत. त्यांच्या सहकार्याने युज, स्टोअर अँड हैंडओव्हर या पद्धतीने काही दिवसांमध्येच मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचे संकलन होईल. प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करणार असल्याचे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी सांगितले.

### श्रीगोंद्यातील तरुणाई व्यसनात अडकली

**श्रीगोंदा :** राज्य सरकारच्या नियमानुसार सुंगधी तंबाखूसारखे आरोग्यास हानीकारक असलेले पदार्थ विक्रीस व बाळगण्यास बंदी असतानाही श्रीगोंद्यात मात्र परराज्यातून गुटखा, सुंगधी तंबाखू सारखे पदार्थ छुप्या पद्धतीने येत असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांकडून तसेच औषध प्रशासनाकडून गुटखा कारवाई करून त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा जप्त केला जात असला, तरी शहरातील पान टपऱ्यांवर मावा गुटखा सहजच उपलब्ध होत आहे.

# संशोधक विद्यार्थी प्राध्यापक यांनी समाजोपयोगी संशोधनाचे धोरण ठेवावे!

**। प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांचे प्रतिपादन**
**। चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयात कार्यशाळा**



**शिरूर: प्रतिनिधी**

**नव्याने होणाऱ्या बदलांशी सुसंवादी राहून आपले संशोधन हे समाजोपयोगी व्हावे म्हणून गुणात्मक दर्जाकडे अधिक लक्ष संशोधक विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकानी देणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी केले.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा तर्फे येथील चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयात पुणे ग्रामीण ग्रामीण विभागातील संशोधन केंद्र प्रमुख,समन्वयक,मार्गदर्शक व पीएच.डी. संबंधित कामकाज पहाणारे कर्मचारी यांची संयुक्त कार्यशाळा आयोजित केली होती. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी प्र-कुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. यशोधर मिठारे, डॉ. प्रभाकर देसाई, डॉ.विजय खरे यांनी संशोधनासंदर्भात विशेष मार्गदर्शन केले.

सुरवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.सी.मोहिते यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना विद्यापीठाच्या विविध संशोधन केंद्रात प्रवेशापासून येणाऱ्या अडचणी सांगून संशोधनाचा दर्जा संभाळून पदवी प्राप्त करताना विद्यार्थ्यांना व केंद्राना येणाऱ्या समस्यांचे कथन केले, संस्थासचिव प्राचार्य नंदकुमार निकम यांनी नव्या बदलांशी सुसंवादी राहून नव्या गोष्टी अवगत होण्यासाठी अशा कार्यशाळांची उपयुक्तता सांगितली.

प्र-कुलगुरू डॉ.पराग काळकर यांनी विद्यापीठाची भूमिका स्पष्ट करताना संशोधक विद्यार्थ्यांनी गुणवत्तेशी तडजोड न करता समाजातील विविध घटकांना उपयुक्त ठरणारे,देशाला,जगाला उपयुक्त ठरेल अशा संशोधनाच्या आवश्यकतेचे महत्त्व असल्याचे सांगितले.संशोधनात गुणवत्ता - पारदर्शकता हवी पण सरकारी धोरणे ठरवताना उपयुक्त ठरेल अशा संशोधनाची आवश्यकता का आहे या विषयी मार्गदर्शन केले. दरम्यान महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राला भेट देऊन तेथील संशोधन उपक्रमांची माहिती करून घेतली. केंद्र समन्वयक डॉ. बाळकृष्ण लळीत यांनी सिंधुरत्ने हा हा ग्रंथ भेट देऊन त्यांचे विभागात स्वागत केले.

माजी प्र-कुलगुरू डॉ.उमराणी म्हणाले की,''आजच्या काळात सक्षमलोकांनाच वाटते की आपण कुठेतरी कमी पडत आहोत,आपल्यावर अन्याय होत आहे. ही मानसिकता बदलणे फारच आवश्यक आहे. राष्ट्रीय विकासात योगदान सांगणारे, मूल्य व्यवस्था बळकट करण्याचे प्रयत्न करणारे संशोधन असावे. ते मार्मिक व मी मौलिक करत असतानाच संशोधन संस्कृती विकसित झाली पाहिजे. संशोधकानेही बदलाला सुसंगत रहावे,विचारांचे संप्रेक्षण जेथे होते ते विद्यापीठ असते. त्यांना सशक्त,परिवर्तनशील विचारांसाठी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास निर्माण करावा लागेल,त्यांना संशोधन करताना आत्मनिर्भर करणे,शास्त्रीय पद्धतीचा वापर करताना विविध उपयुक्तता व गुणवत्ता यावर सर्व घटकांनी भर देणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

दोन सत्रात आयोजित केलेल्या या कार्यशाळेत उपकुलसचिव डॉ, मुंजाजी रासवे यांनी विविध समस्या व प्रश्न यांच्यासंदर्भात मार्गदर्शन व शंकाचे निरसन केले.आनलाईन प्रणाली विषयी श्री.काळे व श्री.गोपाळे यांनी माहिती दिली. या कार्यशाळेच्या संयोजनात डॉ. घनगावकर व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी सहभाग घेतला.विद्यापीठातर्फे मा.सुनिता हजारे

# मीच तुझा हरवलेला मुलगा म्हणत घरात एंट्री

**नाव बदलून आधार कार्ड बनवले । प्रॉपर्टीवरही ठोकला दावा । शंका आल्याने अखेर भांडाफोड**

**सातारा : प्रतिनिधी**

**दोन वर्षांपूर्वी एक साधू घरातील वृद्ध महिलेसमोर आला आणि मीच तुझा हरवलेला मुलगा असे म्हणत घरातील इतर मंडळींचा विश्वास संपादित करत घरात राहायला लागला. या काळात त्याने रेशन कार्ड, आधार कार्ड तसेच सर्व प्रॉपर्टीवर नाव लाऊन घेतले. नंतर महिलेचे निधन झाले आणि हा साधू देखील निघून गेला. वर्षश्राद्धाच्या वेळी परत आला तेव्हा घरातील नातेवाईकांना संशय आला आणि त्याचे बिंग फुटले.**

सातारा येथील या घटनेने सर्वांचेच भुवया उंचावल्या आहेत. अगदी चित्रपटाला देखील लाजवेल असे ही घटना उघडकीस आली आहे. २७ वर्षांपूर्वी हरवेलेला तुझा मुलगा मीच असे म्हणत एका भोंदू साधूने घरात प्रवेश केला आणि तब्बल दोन वर्षे तो या घरात राहिला. अचानक महिलेसमोर मीच तुझा मुलगा असे सांगत महिलेला घट्ट मिठी मारत याने सर्वांना विश्वासात घेतले. महिलेसह त्यांच्या बहिणींना देखील हा मुलगा असल्याचे खरे वाटले होते.

दरम्यान, महिलेचे निधन झाल्यानंतर सर्व विधी देखील यानेच पूर्ण केल्या आणि निघून गेला. वर्षश्राद्ध करण्याची वेळ आली तेव्हा तो पुन्हा आला. यावेळी मात्र



काहींना त्याच्यावर शंका आली आणि त्यांनी थेट पोलिसांना संपर्क केला.

पोलिसांनी चौकशी केली तेव्हा सोमनाथ कुचेकर नावाने मुलगा असल्याचे सांगत राहत असलेल्या या भोंदूबाबाचे बिंग सर्वांसमोर आले. हा मूळचा जळगाव येथील जामनेर येथील असल्याचे समोर आले. तसेच याचे खरे नाव एकनाथ रघुनाथ शिंदे असे आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली आहे.

नाव बदलून या भोंदू बाबाने घरात एंट्री मारली तसेच महिलेची सर्व प्रॉपर्टी देखील त्याने त्याच्या नावावर करून घेतली होती. या सोमनाथ कुचेकर नावाने त्याने आधार कार्ड देखील तयार केले तसेच रेशन कार्ड सुद्धा याने बनवून घेतले होते. याचे बिंग बाहेर आल्यानंतर पोलिसांनी ही सर्व कागदपत्रे पुन्हा कुटुंबीयांकडे सुपूर्द केले असून आरोपी बाबावर योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

# महिलेला विळ्याने मारहाण

**तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**



**नगर : प्रतिनिधी**

**शेत जमिनीच्या वादातून महिलेला शिवीगाळ, मारहाण करून विळ्याने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात महिला जखमी झाली असून तिच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. शंकुतला भाऊसाहेब वामन (वय ५५ रा. खंडाळा, ता. नगर) असे जखमी महिलेचे नाव आहे. सदरची घटना ता. ५ डिसेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास खंडाळा शिवारात घडली असून महिलेने दिलेल्या जबाबावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सुखदेव वामन, अक्षय सुखदेव वामन, किरण सुखदेव वामन (सर्व रा. खंडाळा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी व संशयित आरोपी यांच्यात शेत जमिनीवरून वाद आहे. ५ डिसेंबर रोजी फिर्यादी शेतात माती टाकत होत्या त्यावेळी संशयित आरोपींनी त्यांना माती टाकण्यास विरोध केला असता त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तर अक्षय वामन याने त्याच्या हातातील विळ्याने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या पंजावर मारून जखमी केले. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे. अधिक तपास महिला पोलीस अंमलदार काळे करत आहेत.

# दारूच्या नशेत बकोरीत ॲम्बुलन्सवर गोळीबार

**तिघांना अटक । एकाला व्यसनमुक्ती केंद्रात नेण्यासाठी आली होती गाडी**

**पुणे : प्रतिनिधी**

**व्यसनमुक्ती केंद्रात मित्राला घेऊन जाण्याच्या तयारीत असलेल्या ॲम्बुलन्सवर दारूच्या नशेत गोळीबार केल्याचा धक्कादायक प्रकार केसनंद रोडवरील बकोरी येथे घडली. वाघोली पोलिसांनी गोळीबार केल्याप्रकरणी तिघांना बेड्या ठोकल्या आहेत.**

विशाल रामदास कोलते (३२, रा. बकोरी, ता. हवेली, जि. पुणे), संदिप कैलास हरगुडे (४२) आणि अमोल राजाराम हरगुडे (३६, दोघेही रा. केसनंद, ता हवेली, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत एका ३५ वर्षाच्या व्यक्तीने वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

संदीप हरगुडे ह्याला दारूचे व्यसन आहे. त्याचे दारूचे व्यसन सोडविण्यासाठी त्याच्या घरच्यांनी व नातेवाईकांनी त्याला लोणी काळभोर येथील व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. गुरूवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास संदीप हरगुडे हा त्याचे मित्र आरोपी विशाल कोलते, अमोल हरगुडे यांच्यासोबत बकोरी रोडवरील आर्यन बिअरबार येथे दारू पिण्यासाठी बसले होते. यावेळी



त्याच्या घरच्यांनीॲम्बुलन्स बोलविली. संदीप हरगुडे दारू पित बसलेल्या बारच्या ठिकाणी गेली. यावेळी त्याला नेण्यासाठी आल्याचे समजल्यानंतर विशाल कोलते याने त्याच्याकडील पिस्तुलातून ॲम्बुलन्सवर गोळीबार केला. तसेच ॲम्बुलन्सच्या काचा फोडून दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. यावेळी प्रसंगावधान दाखविल्याने ॲम्बुलन्स चालक बचावला. यावेळी घटनेची माहिती मिळताच वाघोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंडीत रेजितवाड यांनी घटनास्थळी घाव घेतली. त्यानंतर लागलीच टिम तयार करून आरोपींना बेड्या ठोकल्या.

(पान १ वरून)

## जनतेच्या अपेक्षा पुर्ण करण्याला प्राधान्य

प्राधान्यक्रम भविष्यात असल्याचे ना.विखे पाटील म्हणाले.अहिल्यानगर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये नवे उद्योग आणून युवकांना रोजगार निर्माण करून देणे हा माझा प्राधान्यक्रम असणार आहे.यासाठी जिल्ह्याचा औद्योगिक विकास आराखडा तयार करण्यात आला असून त्यावर काम सुरू करायचे आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनाला यंदा तिनशे वर्ष पूर्ण होत आहेत.त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभारायचे हे उद्दीष्ट्य पूर्ण करायचे असून केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने स्मारक उभारले जाणार असून त्याचा आराखडा तयार कराण्यात आल्याची माहिती विखे पाटील यांनी दिली.

श्रीक्षेत्र नेवासा येथे ज्ञानेश्वर सृष्टीची उभारणी,गोदावरी कालव्याचे नूतनीकरण आणि निळवंडे कालव्याचे राहीलेले काम पूर्णत्वास नेणे हाच आपला पुढील काही दिवसांचा यांनी असेल असेही विखे पाटील यांनी सांगितले.

**लाडक्या बहीणींच्या अर्जाची पडताळणी नाही**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सहभागी झालेल्या महीलांच्या अर्जाची पडताळणी कुठेही सुरू नसल्याचे स्पष्ट करून महायुतीने जाहीरनाम्यात या योजनेचे अनुदान २१००रुपये करण्याची ग्वाही दिली त्याची पूर्तता निश्चीत होईल असे विखे पाटील यांनी ठामपणे सांगितले.

## ''महायुतीत मलईदार खात्यांसाठी भांडणं''

मागणी केली. मात्र, आज राज्यात तीन जणांचे जे सरकार आहे, सरकारमध्ये मलाईच्या खात्यासाठी भांडणं सुरु आहेत. मलाईचे खाते कोणाला मिळतात? फक्त यासाठी सरकार काम करत आहे. मग या सरकारने प्रशासनाला जे काही आदेश दिले त्या आदेशाच्या जोरावर परभणीत लाठीचार्ज झाला. मग परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलीस अधीक्षकांना लाठीचार्ज करण्याचे आदेश कुणी दिले होते? त्यामुळे यावर देखील कारवाई झाली पाहिजे'', असं नाना पटोले म्हणाले.

''दिल्लीतील मोदी सरकार ज्या प्रमाणे शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्याचा प्रयत्न करतं. त्याप्रमाणे आता महाराष्ट्रात देखील घडतंय का? तसा संदेश देण्याचा प्रयत्न आहे का? पण आम्ही महाराष्ट्रात हे कदापि चालू देणार नाही.काँग्रेसमहाराष्ट्रात हिटलरशाही चालू देणार नाही'', असा इशाराही नाना पटोले यांनी महायुतीच्या सरकारला दिला. विधानसभेच्या निकालाबाबत बोलताना ते म्हणाले, ''विधानसभा निवडणुकीचा निकाल ज्या प्रकारे आलेला आहे. त्या निकालाच्या धक्यातून लोक देखील बाहेर आलेले नाहीत. निकालाबाबत आजही अनेक ठिकाणी ग्रामपंचायतमध्ये लोक ठराव घेताना दिसत आहेत. तसेच बॅलेटपेपरची मागणी करत आहेत. आम्ही दिलेलं मतदान नेमकं कोणाला गेलं हे शोधण्याचं काम लोक करत आहेत'', असंही नाना पटोले म्हणाले.

विधानसभा निवडणुकीच्या निकालात काँग्रेसला आलेल्या अपयशानंतर नाना पटोले हे काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देणार असल्याची चर्चा होती. तसेच त्यांच्यावर पक्षातील काही नेत्यांनी टीका केली होती. दरम्यान, यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले, ''आरोप-प्रत्यारोप हे सर्व पक्षात सुरु असतात. राजकीय मतभेद फक्त काँग्रेसमध्ये आहेत असं नाही. त्यामुळे पक्षांतर्गत ज्या बाबी आहेत त्या पक्षातच सोडवल्या जातात. निवडणुकीत संपूर्ण काँग्रेस सहभागी झाता होता. त्यामुळे पक्षात कोणताही वादाचा विषय नाही तर निवडणुकीत आलेलं अपयश हा आत्मचिंतनाचा भाग आहे'', असंही नाना पटोले यांनी म्हटलं.

**वाचकांच्या लेखणीतून**

# अनामिक हुरहूर

एखाद्या चेतन अथवा अचेतन वस्तू वा जाणिवेचे अनस्तित्व आपण अनुभवतो तेव्हा त्या स्थितीला हुरहूर असे म्हणता येईल. एखाद्या कारभारणीला अंधार पडला तरी शेतकरी पतीचे घरी परतून न येणे तिला हुरहूर लावते. गायीचे वासरू मृत झाल्याने त्याच्या अनस्तित्वाने तिच्या जिवाची हुरहूर आपल्याला जाणवते.

निघोज या गावातील आमच्या आळीला शेजारीच काही पडके आणि पडीक वाडे होते. तेथे दिवसासुध्दा जाणे आम्हा मुलांना भीतीदायक वाटे असे ते भकास आणि भयानक वाडे होते! गाव सोडून गेलेल्या ब्राह्मणांचे ते वाडे होते असे म्हणत. दरवाजे आणि खिडक्यांचे फक्त सांगाडे उरले होते. भिंतीची माती पावसाने ओघळून गेल्याचे स्पष्ट दिसत होते. एखादा अर्धा दरवाजा वाऱ्याने खटखट धडकल्याचा आवाज ऐकू येई.

मकीं की फ़िराक़ में मकां रोते हैं

रहादाराच्या विरहाने घरे रडत आहेत. असा उर्दू शायरीतील एक मिसरा (काव्यचरण) आठवला. आमच्या घरांच्या बाजूलाच तसल्या पडक्या वाड्यासमोर मोठा पिंपळपार होता. त्याच्या भोवती मोकळा आवार होता. चांदण्या रात्री तिथल्या पिंपळावर कावळ्यांची शाळा भरायची. रात्रीच्या त्या निरव



शांततेत कधी कधी कावळ्यांची काव काव किंवा पिंपळपानांची सळसळ ऐकू येई. त्यात गांभीर्य जाणवे. पिंपळाच्या झाडाला आपल्या संस्कृतीत मोठे पवित्र स्थान आहे. धार्मिक आणि वैज्ञानिक अशा दोन्ही दृष्टींनी. पिंपळाचे झाड पाडू किंवा तोडू नये म्हणतात. पण आता मूळ जागी पिंपळही नाही आणि पारही नाही. तेथे आता नांदते घर उभे आहे. आमच्या आळीच्या रस्त्याने जाताना ती जागा पाहिली म्हणजे माझ्या हृदयाला अनामिक हुरहूर लागल्याचे जाणवते.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# रेनवडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळविली प्रेक्षकांची वाहवा!

## समूह गीत गायनात संगीत, ताल, सुरांचा मिलाप । जिल्हास्तरीय गीत गायन स्पर्धेसाठी शाळेची निवड



**रेनवडी : प्रतिनिधी**

**देवीभोयरे येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत रेनवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी ताला-सुरात सादर केलेल्या गीताने प्रेक्षकांची वाहवा मिळविली. मोठया गटामध्ये प्रथम क्रमांक पटकाविलेल्या या शाळेची जिल्हा स्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.**

अहमदनगर जिल्हा परिषद तसेच पारनेर येथील पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवीभोयरे येथे पार पडल्या. केंद्र पातळीवर प्रथम आलेल्या २३ केंद्रातील शाळांनी तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. सामुहिक प्रकारामध्ये सांस्कृतिक, समूहगीत गायन, वैयक्तिक प्रकारामध्ये वकृत्व, हस्ताक्षर, वेशभुषा सादरीकरण, कथा कथन, वैयक्तिक गीत गायन या प्रकारांमध्ये स्पर्धा पार पडल्या. समूहगीत गायनामध्ये संगीत-ताल-लय यांचा उत्कृष्ट मिलाप असलेल्या रेनवडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने मोठया गटामध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक पटकवत जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

शाळेचे उपक्रमशील शिक्षक संजय बेलोटे, नीलेश कवडे, सचिन गांगड, अश्विनी काणे, मच्छिंद्र पावडे, मुख्याध्यापक राजाराम सालके, तबलापटू मधुकर येवले यांचे यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी तसेच शाळेने मिळविलेल्या या यशाबददल पारनेर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सीमा राणे, विस्तराधिकारी रावजी केसकर, केंद्र प्रमुख दौलत येवले, सरपंच श्रीकांत डेरे, उपसरपंच कांचनताई येवले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजाराम येवले, ग्रामपंचायत, विविध संस्थांचे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांनी अभिनंदन करून कौतुक केले तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### धडे नाहीत तरीही ताल-सुरांचा मिलाप !

**रेनवडी शाळेच्या पूर्वा झिंजाड, पौर्णिमा येवले, स्वरांजली येवले, तनुष्का डेरे, वैष्णवी येवले, वैशाली येवले, समृध्दी येवले या विद्याथनी गायन स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. ग्रामीण भागात शिक्षण घेत असताना संगिताचे कोणतेही धडे घेतलेले नसतानाही कवी कुसुमाग्रज लिखित व गझल गंधर्व सुधाकर कदम यांनी संगितबध्द केलेले हे शिव सुंदर, समर, शालिनी हे गीत त्यांनी हुबेहूब सादर करीत उपस्थित प्रेक्षकांची वाहवा मिळविली.**

### नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणारी शाळा

**पारनेर तालुक्याच्या दुर्गम भागात तसेच शेवटच्या टोकावर असलेली रेनवडी शाळा ही एक गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून ओळखली जाते. शिक्षक व पालक यांच्या समन्वयातून शाळेत विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून व शिक्षकांच्या प्रयत्नातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.**

**राजाराम सालके**
**मुख्याध्यापक**

# दत्त जयंतीनिमित्त कळमकरवाडीत यात्रोत्सव

## मंगला बनसोडे यांच्या लोकनाटयाचेही आयोजन

**सुपा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील कळमकरवाडी येथील ग्रामदैवत श्री दत्त मंदिरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या दत्त जयंती उत्सवानिमित्त रविवार दि.१५ डिसेंबर रोजी यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सरपंच विक्रमसिंह कळमकर यांनी दिली.**




कळमकरवाडी येथे ग्रामदैवत, महानुभाव पंथीयांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीकृष्ण अवतार अर्थात एकमुखी दत्त मंदिर आहे. दरवर्षी मार्गशीर्ष पौर्णिमेला कळमकरवाडीत दत्त जयंतीचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या वतीने यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

यात्रोत्सवाची तयारी पुर्ण झाली असून लोकसहभागातून संपूर्ण परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम पुर्ण झाले आहे. येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन रांगा, वाहन पार्किंग, पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उत्सवानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

रविवारपासून दोन दिवस चालणाऱ्या या यात्रोत्सवाचा भाविक भक्त, तमाशा रसिक यांनी लाभ घेण्याचे आवाहन सरपंच कळमकर, ग्रामपंचायत सदस्य शितल औटी, अपेक्षा कळमकर, सोसायटीचे चेअरमन डी बी करंजुले, व्हाईस चेअरमन अप्पासाहेब कळमकर, सोसायटीचे संचालक गणेश कळमकर, नंदा कळमकर, यात्रा कमीटीचे खजिनदार भाऊसाहेब कळमकर, महानुभाव पंथाच्या वतीने गणपत औटी, भागुजी कळमकर, राजूदादा कळमकर, साहेबराव कळमकर, भानुदास कळमकर, शहाजी कळमकर, वसंत कळमकर, रघुनाथ कळमकर, गुलाब कळमकर, संजय कळमकर, देविदास कळमकर, संपत कळमकर, दादा कंद यांनी केले आहे.

### कार्यक्रमाचे स्वरूप

**यावर्षी रविवार दि. १५ रोजी पहाटे पाच वाजता जन्मोत्सव, सकाळी दहा वाजता शेरणी वाटप, दुपारी तीन वाजता पालखी मिरवणूक तर रात्री दहा वाजता महाराष्ट्रातील अग्रगण्य मंगला बनसोडे यांच्या लोकनाटय तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. १६ रोजी सकाळी तमाशा हजेरीने यात्रेची सांगता होणार असल्याचे सरपंच कळमकर यांनी सांगितले.**

# थायलंडच्या उद्योगपतीची कृष्णानंद उद्योगास भेट!

## व्यवस्थापन व ग्राहकाभिमुख धोरणाचे कौतुक



**निघोज : प्रतिनिधी**

**थायलंडच्या सी.पी.एफ. कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट मिस्टर सुराचाई यांनी कृष्णानंद दुध समुहास भेट देत दुध समुहाच्या उत्कृष्ट व्यवस्थापन आणि ग्राहकाभिमुख धोरणाचे कौतुक केले.**

यावेळी बोलताना मिस्टर सुराचाई म्हणाले, ग्राहकाभिमुख सेवा देताना उद्योग, दुध उत्पादक शेतकरी व ग्राहक यांचा समन्वय साधलाग गेल्याने उत्कृष्ट व्यवस्थापनाच्या जोरावर कृष्णानंद दुध उद्योग समुह यशस्वी झाला आहे.

मिस्टर सुराचाई यांनी नुकतीच कृष्णानंद फुड प्रॉडक्टर प्रा.लि. या कंपनीस भेट देत कामकाजाची माहिती घेतली. दर्जेदार मालाचे उत्पादन व विक्री व्यवस्थापनाचे कौतुक करत या उद्योग समुहाचे भविष्य उज्वल असल्याचे त्यांनी सांगितले. या उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सी पी एफ कंपनी पुढाकार घेऊन काम करणार असल्याची ग्वाही मिस्टर सुराचाई यांनी यावेळी दिली. त्यांनी कृष्णानंद इंडस्ट्रिजो अध्यक्ष मंगेशशेठ लंके यावेळी उपस्थित होते. थायलंडच्या सी पी एफ कंपनीचे जनरल मॅनेजर डॉ. कचर्ल, भारतातील व्यवस्थापक देवेन कापसे, सिनियर मॅनेजन मधुकर पांडे हे यावेळी उपस्थित होते.या मान्यवरांचा उद्योग समुहाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आर बी अ‍ॅग्रो प्रॉडक्टर व्हिजन प्लास्टो व गाथा फुड प्रॉडक्ट या कंपन्यांचीही बारीक सारीक माहिती घेत कौतुक केले.

कृष्णानंद उद्योग समुहाचे चेअरमन दत्ताशेठ भुकन, बालाजी मिल्क

### उत्पादकांच्या विश्वासास पात्र

**दुध उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव देऊन उद्योग समुह दुध उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वासास पात्र ठरला आहे. याच विश्वासार्हतेमुळे हा उद्योग समुह पुणे व नगर जिल्ह्यातील गावांमध्ये लाखो लिटर दुधाचे संकलन करून दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करत आहे. व्यवस्थापन उत्कृष्ट पध्दतीचे असल्याने या उद्योगाचा अल्पावधीत नावलौकीक झाला आहे.**

**खंडू भुकन**
**कृष्णानंद उद्योग समुहाचे मार्गदर्शक**

# संगमतीरावर गोडसे गुरुजींचे पारायण



**भाळवणी : प्रतिनिधी**

**दत्त जयंती निमित्त भाळवणी येथील सेवानिवृत्त शिक्षक देवराम गोडसे गुरुजी व त्यांच्या दोन कन्यांनी श्री.क्षेत्र गाणगापूर येथील संगमतीरावर तीन दिवसांचे पारायण केले.**

गोडसे गुरूजींची संगमतीरावरील पारायणाची ४० वर्षांची अव्याहत परंपरा आहे.यावर्षी त्यांच्या कन्या भाग्यश्री भोसले, मिनाक्षी पंडित , राधाकृष्ण कोलते,शंकर जारकड ,संतोष खरमाळे,किरण गुंजाळ हे सहभागी झाले होते.

# देवराम भगत निधन

**पिंपरी जलसेन : प्रतिनिधी**



**पारनेर तालुक्यातील पिंपरी जलसेन येथील देवराम नारायण भगत यांचे नुकतेच वृद्ध काळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्षाचे होते.**

त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा चार मुली नातवंडे परतवंडे असा परिवार आहे. पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. विनायक करकंडे यांचे ते साडू होते. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ असल्याने परिसरात हळूहळू व्यक्त होत आहे.

# ज्ञानेश्वर वरखडे यांचे संघटन कौतुकास्पद

## अशोक सावंत यांचे गौरवोद्गार । उपसरपंच चषक स्पर्धेचा शुभारंभ

**निघोज : प्रतिनिधी**

**विधायक कामांच्या माध्यमातून निघोजचे उपरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी उभे केलेले युवा संघटन निश्चित कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांनी काढले.**



निघोज येथे ज्ञानेश्वर वरखडे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धे चे अशोक सावंत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

संदीप पाटील जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली काम करताना ज्ञानेश्वर वरखडे यांनी आजवर अनेक विधायक उपक्रम राबविल्याचे सांगत यावेळी बोलताना सावंत म्हणाले, उपसरपंच चषक स्पर्धेच्या माध्यमातून वरखडे यांच्या युवा संघटनाची चुणूक पहावयास मिळाली.

भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, मा. सरपंच लटांबळे, ठेकेदार बाबाजी लंके, युवा नेते गंगादादा वरखडे, अक्षय वरखडे, बजरंग मंडळाचे कार्यकर्ते तसेच क्रिकेटप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता या क्रिकेट स्पर्धेचे बक्षिस वितरण परिसरातील मान्यवर तसेच आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रसिध्द गायीका व नृत्य दिग्दर्शिका सायली पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह अक्षय वरखडे, सुशांत वरखडे, नागेश वरखडे, संकेत वरखडे, ओम पानमंद, किशोर वरखडे यांनी केले आहे.

### ७५ हजार रूपयांची बक्षिसे

**तीन दिवसांच्या या स्पर्धेसाठी ७५ हजार रूपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून पारनेर तालुक्यातील अनेक संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. सचिन वराळ, पृथ्वीराज खुपटे, मनोज मुंगसे, गणेश कटारिया, सुनील पवार, राहुल थोरात, अर्जुन लामखडे, खंडूशेठ घुले यांनी विविध बक्षिसांसाठी सौजन्य दिले आहे.**

# तालुकास्तरीय स्पर्धेतही पिंपरी जलसेनचाच डंका!

## हस्ताक्षर व वकृत्व स्पर्धेत ईश्वरी, राधिका तालुक्यात प्रथम




**पिंपरी जलसेन : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत पिंपरी जलसेन शाळेने घवघवीत यश संपादन करीत केंद्र स्तरावरील यशाची परंपरा कायम राखली. ईश्वरी सोनवणे हिने हस्ताक्षर तर राधिका ढवण हिने वकृत्व स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला.**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या वतीने तालुक्यातील विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी केंद्र स्तरावर विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांची तालुका स्तरावरील स्पर्धे साठी निवड झाली होती. तालुकास्तरीय स्पर्धा नुकत्याच पारनेर येथे पार पडल्या. त्यात पिंपरीजलसेन शाळेचे यश संपादन करीत आपला नावलौकिकास साजेशी कामगिरी केली.

स्पर्धेमधील यशस्वी विद्यार्थ्यांचे सरपंच सुरेशराव काळे, उपसरपंच वर्षाताई पानमंद, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप अडसरे, शाळेचे मुख्याध्यापक पांडूरंग पवार यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सतिश भालेकर, मल्हारी रेपाळे, जयप्रकाश साठे, प्रशांत दिघे, मंगला हराळ, शारदा तांबे, पियंका हजारे, सिंधू वाघ या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### प्रवेशासाठी पालक उत्सुक

**जिल्हा परिषदेची पिंपरीजलसेन ही शाळा उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये आजवर सातत्याने यश संपादन केले आहे. शाळेच्या सर्वांगीण प्रगतीची दखल घेऊन अनेक पालकांनी आपल्या पाल्यांचा या शाळेत प्रवेश घेण्यासाठी कल वाढतो आहे.**

### यशस्वी विद्यार्थी

**हस्ताक्षर स्पर्धा किशोर गट : ईश्वरी अंकुश सोनवणे तालुक्यात प्रथम. वकृत्व स्पर्धा कुमार गट : राधिका राहुल ढवण तालुक्यात प्रथम. वैयक्तिक गीत गायन स्पर्धा कुमार गट : साई ऋषीकेश पुजारी तालुक्यात व्दितीय.**

# दत्त जयंतीचे निमित्त, मळगंगा प्रसादालयास देणगी!

## नीलेश वराळ यांचे दातृत्व

**निघोज : प्रतिनिधी**

**दत्त जयंतीचे औचित्य साधून मुळ निघोजकर व मुंबईतील गौरी गणेश कंपनीचे संचालक नीलेश शंकर वराळ यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचलित प्रसादालयास अन्नदानासाठी देणगी देत आपले दातृत्व सिध्द केले.**



वराळ परिवाराने देगणी दिल्याबद्दल शंकरशेठ वराळ यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने डॉ. विक्रम वराळ यांच्या हस्ते तसेच मळगंगा ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, कुकडीचे सेवानिवृत्त अधिकारी वाय.एम.वराळ, व्यवस्थापक महेश ढवळे, तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, सागर ईरोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

मुंबईतील व्यवसायीक व मळगंगा नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक शंकरशेठ वराळ यावेळी बोलताना म्हणाले की, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष शांताराम लंके, उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, संघटक रामदास वरखडे, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वास शेटे, तसेच विश्वस्त मंडळ, ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ यांच्या सहकार्यातून निघोज परिसरात मोठया प्रमाणावर विकास कामे झाली असून मळगंगा देवस्थान तिर्थक्षेत्र तसेच पर्यटन क्षेत्र म्हणून म्हणून जगप्रसिध्द रांजणखळगे परिसराचा विकास झाला आहे. सामाजिक भावनेतून प्रसादालय सुरू करून ट्रस्टने भाविकांची खऱ्या अर्थाने सेवा केली आहे. असाच सेवा भाव तसेच सामाजिक उपक्रमांची आवष्यकता असल्याचे शंकर वराळ यांनी सांगितले.

### हे तर आमचे कर्तव्य !

**मळगंगा देवस्थान हे राज्यातील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून अनेक समाजाभिमुख उपक्रम राबविले जात असून त्याचाच एक भाग म्हणून अलिकडेच भाविकांसाठी प्रसादालय सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमास मदत करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.**

**शंकरराव वराळ उद्योजक, मुंबई**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com